बांधकाम विकास विभाग

पुणे महानगरपालिका

# पुणे महानगरपालिका

## इंजिनिअर/ स्ट्रक्चरल इंजिनिअर (डिझाईनर) च्या कामासाठी परवाना

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ अन्वये पुणे शहरासाठी दि.५-१-८७ रोजी मान्य झालेल्या विकास बांधकाम नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.६-४, अपेंडिक्स 'सी' अन्वये आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७२ अन्वये इंजिनिअर/ स्ट्रक्चरल इंजिनिअर (डिझाईनर) काम करण्यास परवाना देण्यात येत आहे.

परवाना क्र. : 1136 From 01-01-2016 To 31-12-2016 (License Engineer)

नाव:VIKAS SHAURAJ PATIL

पत्ता:vikas india bhavan, audumbercolonyooff kakade city karvenagar karve road PRBHAT RD., PUNE 04.

दिनांक : 15/1/2016

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ अन्वये पुणे शहरासाठी दि.५-१-८७ रोजी मान्य झालेल्या विकास बांधकाम नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.६-४, अपेंडिक्स 'सी' अन्वये आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ३७२ अन्वये मी तुम्हांस वर निर्देश केलेल्या कायदा व नियमानुसार एक वर्षाकरिता दि. 01-01-2016to 31-12-2016अखेर इंजिनिअर/ स्ट्रक्चरल इंजिनिअर (डिझाईनर) म्हणून 'खालील मर्यादा व अटी यांचे पालन करणार' या या अटीवर परवाना देत आहे.

मा.महापालिका आयुक्त, यांनी वेळोवेळी स्थायी समितीच्या संमतीने वरील कायद्याचे कलम ३७३ परवानाधारण करणार यांच्या माहितीसाठी काढण्यात आलेल्या आज्ञेचे आणि विकास (बांधकाम) नियंत्रण नियमावलीतील अपेंडिक्स सी मधील 'कतव्ये व जबाबदारी यांचे पालन करणार' ही परवानगीची अट राहील आणि धंद्याच्या प्रत्येक बाबतीत परवान्याच्या मुदतीत ज्यावेळी तुमचा सल्ला घेण्यात येईल त्यावेळी तुम्ही आतापावेतो निघालेल्या आज्ञांचे पूर्णपणे पालन करून त्याप्रमाणे काम करावयाचे आहे.

जी आज्ञापत्रक वेळोवेळी काढण्यात आली आहेत, ती मुख्य कार्यालयाकडे माहितीसाठी ठेवण्यात आलेली असून, जरूर त्यावेळी कार्यालयाच्या वेळेमध्ये त्यांची पाहणी करता येईल.

मात्र हे लक्षात घेणे जरूर आहे की, मा.महापालिका आयुक्त सदरचा परवाना कलम ३८६ अनुसार जरूर तेव्हा तात्पुरता बंद अगर रद्द करू शकतात. जर वर निर्दिष्ट केलेली बंधने अगर शर्ती चांचा भंग झाला अगर टाळल्या गेल्या अथवा तुम्ही सदर कायद्याच्या नियमांचे अगर वेळोवेळी काढण्यात आलेल्या आज्ञापत्रकांचे उल्लंघन केल्याचे दृष्टोपतीस आल्यास आणि जर सदरचा परवाना तात्पुरता तहकुब अगर रद्द झाल्यास अथवा सदरच्या परवान्याची मुदत संपल्यावर तुम्हास कायद्याच्या सर्व बाबतीत परवाना नसल्याचे समजून मा.महापालिका आयुक्त, सदरची तहकुबी अगर रद्द बातलता परत रद्द करून त्या ऐवजी नवीन परवाना देईपर्यंत तुम्हांस परवाना नसल्याचे समजले जाईल आणि महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६९ अन्वये मा.महापालिका आयुक्त, अगर त्यांनी अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यांनी सदर परवान्याची मागणी केल्यास सदरचा परवाना तुम्हांस त्या त्या वेळी हजर करावा लागेल.

महाराष्ट्र शासनाने पुणे शहरासाठी मान्य केलेल्या विकास (बांधकाम) नियंत्रण नियमावरीलनुसार परवाना शुल्क म्हणून रू. २५०/ वार्षिक ठरविले आहे.

उप अभियंता, (बांधकाम विकास विभाग)
पुणे महानगरपालिका

नगर अभियंता
पुणे महानगरपालिका

टीप:- प्रस्तुत परवान्याची मुदत दि.३१ डिसेंबर रोजी संपते. जर पुढील वर्षासाठी त्याचे नुतनीकरण करणे असेल तर यासाठी माहे जानेवारीमध्ये परवाना शुल्कासहीत अर्ज सदर केला पाहिजे. परवान्याचे नुतनीकरण करून घेण्याबद्दल तुम्हांस वेगळी समज दिली जाणार नाही आणि जो पर्यंत परवान्याच्या नुतनीकरणासाठी परवाना शुल्कासहीत अर्ज दिलेला नाही तोपर्यंत इंजिनिअर/ स्ट्रक्चरल इंजिनिअर (डिझाईनर) म्हणून काम करता येणार नाही. तसेच परवाना नाकारल्यासही तुम्हांस इंनिअर/ स्ट्रक्चरल इंजिनिअर (डिझाईनर) म्हणून काम करता येणार नाही.